Mahanagari 10 Jan, 2006

# अक्षय कुमारचा आवाज - अरनब चक्रवर्ती

'खाकी' चित्रपटात अरनब चक्रवर्तीने अक्षय कुमारसाठी गाणे म्हटले. राजकुमार संतोषीचा 'फैमिली' चित्रपट लवकरच येत आहे. या चित्रपटात अक्षयसाठी अरनबरने तीन गाणी म्हटली आहेत. हिंदी चित्रपट सृष्टीला अक्षयचा आवाज म्हणून ओळख होत आहे. त्याच्याशी केलेली बातचीत

*** 'फैमिली'चा प्रस्ताव कसा मिळाला?**

राजकुमार संतोषी यांच्या 'खाकी' चित्रपटातील मी गायलेले 'वादा रहा....' हे गीत हीट झाले. त्यासाठी मला झी सिनेमाचे नामांकन मिळाले. या यशामुळेच 'फैमिली'चा प्रस्ताव मिळाला. संगीतकार राम संपत यांनी विशेष शिफारस केली.

*** 'फैमिली'मध्ये अक्षयसाठी तीन गाणी म्हटलीत?**

हो, 'कतरा....कतरा...', 'जनम जनम... 'आणि 'क्विक बाईट....' तीनही गाणी एकमेकांपासून भिन्न प्रकारची आहेत.



*** तू मूळचा कोलकत्त्याचा मग हिंदी फिल्म इंडस्ट्रीजमध्ये कसा प्रवेश मिळवला.?**

सहा वर्षांपूर्वी मी कोलकत्त्यावरून मुंबईला आलो. सुरुवात ठीकच होती. मी माझ्या आवाजाची टेप संगीतकारांना ऐकविली. 'रिमिक्स', 'जिंगल्य', प्रादेशिक भाषेत गाणी गायली. आता हिंदी चित्रपटात गातो आहे.

*** गाण्याचे शिक्षण कोठे घेतलेस?**

मी गौतम मुखर्जी यांच्याकडे गाण्याचे शिक्षण घेतले. पं. अच्युत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईत दोन वर्षांचा संगीत विषयातील डिप्लोमा केला.

*** सध्याच्या संगीताला आधुनिक तंत्र कसे उपयुक्त ठरते?**

स्टुडिओतील वेळ व पैसे वाचवतात, मात्र, त्याचा योग्यप्रकारे वापर करण्याची गरज आहे.

*** तुला अक्षय कुमारचा आवाज म्हटले जाते?**

यासाठी मी ईश्वराचा आभारी आहे. त्याच बरोबर सर्व श्रोते आणि मला सहकार्य करणाऱ्या सर्वांबाबत कृतज्ञता व्यक्त करतो.

मला मिळणाऱ्या यशाचा मी आनंद घेतोय. मात्र माझे कामावर पूर्ण लक्ष आहे. थोड्याशा स्तुतीने मी मुळीच हुरळून जाणार नाही.

*** पुढे काय?**

प्रत्येक दिवशी मी उत्तम गायक होण्यासाठी प्रयत्न करतोय. अर्थपूर्ण गाणी गाऊन प्रेम, शांती आणि एकतेचा संदेश सर्वदूर पसरू इच्छितो.